सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २१४ | रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. उमेश पाटील
प्रदेशाअध्यक्ष : राष्ट्रवादी ग्रंथ विभाग



श्री. प्रकाश मेखा
निवृत्त मुख्याध्यापक



श्री. किशोरशेठ ललवाणी
माजी विश्वस्त खा. शि. मंडळ, काँग्रेस नेते

# वीज मंडळाचा ग्राहकांना 'दे धक्का'

## ऑडिशनल सिक्युरिटी डिपॉझिट नोटिसांमुळे वाढला संभ्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरासह तालुक्यातील वीज ग्राहकांना महावितरणकडून 'ऑडिशनल सिक्युरिटी डिपॉझिट' भरण्याच्या नोटिसा पाठवण्यात आल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. वापरावर आधारित अतिरिक्त रक्कम भरण्याच्या सूचनेमुळे अनेक ग्राहकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, ही नेमकी कोणती आकारणी आहे याबाबत चर्चा सुरू आहे.

महावितरणकडून पाठवण्यात आलेल्या सूचनेनुसार, संबंधित ग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा ठेव भरणे आवश्यक आहे. ही रक्कम ग्राहकाच्या वीज वापराच्या आधारे निश्चित केली जाते. वाढता वीज वापर आणि संभाव्य थकबाकीचा धोका लक्षात घेऊन ही ठेव मागितली जात असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या सप्लाय कोड २०२१ च्या कलम १३.४ नुसार, ग्राहकांना ही रक्कम एकरकमी भरण्याबरोबरच सहा किंवा त्यापेक्षा कमी समान मासिक हप्त्यांमध्ये भरण्याचा पर्याय उपलब्ध आहे. त्यामुळे काही प्रमाणात ग्राहकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

तथापि, अचानक आलेल्या या अतिरिक्त आर्थिक भारामुळे सर्वसामान्य ग्राहक त्रस्त झाले आहेत. "आधीच वीज बिल वाढलेले असताना आता अतिरिक्त ठेव भरणे कठीण झाले आहे," अशी प्रतिक्रिया काही ग्राहकांनी व्यक्त केली. विशेषतः मध्यमवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी ही रक्कम अतिरिक्त ताण निर्माण करणारी ठरत आहे.

> दर वर्षी एप्रिल महिन्यात ग्राहकांच्या वीज वापरानुसार ऑडिशनल सिक्युरिटी डिपॉझिटचे बिल पाठवले जाते. ही रक्कम ग्राहकांच्या नावावर जमा राहते व थकबाकी झाल्यास त्यातून वजावट केली जाते. त्यामुळे ग्राहकांनी घाबरण्याचे काही कारण नाही.
>
> **– हेमंत सैंदाणे,**
> सहाय्यक अभियंता, अमळनेर शहर

स्थानिक पातळीवर या निर्णयाबाबत अधिक स्पष्टता देण्याची मागणी होत असून, महावितरणने व्यापक जनजागृती करून नागरिकांचा संभ्रम दूर करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सवलत किंवा विशेष सुलभता द्यावी, अशी मागणीही पुढे येत आहे. दरम्यान, वीज वितरण विभागाकडून ग्राहकांना नोटिसा गांभीर्याने घेऊन वेळेत रक्कम भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अन्यथा पुढील प्रशासकीय कारवाई होऊ शकते, असा इशाराही देण्यात आला आहे.





# दाजीबा नगरचे गतिरोधक अखेर उखडून टाकले

## बेकायदेशीर गतिरोधकामुळे आणखी एक बालक जखमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गलवाडे रस्त्यावरील दाजीबा नगर येथील बेकायदेशीर गतीरोधकामुळे मोटरसायकल आदळून मंगरूळ येथील साडेतीन वर्षांचे बालक जखमी झाल्याची घटना २४ रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास घडली. अखेर ते गतिरोधक उखडून टाकण्यात आले. मंगरूळ येथील बापू अभिमन पाटील हे आपल्या नातेवाईकांच्या हळदीला पाडसे येथे गेले होते. मोटरसायकलने आपली पत्नी आणि नातू हिमांशू प्रमोद पाटील (वय साडे तीन वर्षे) यांच्यासोबत परत अमळनेर येत असतांना कुठलेही फलक न लावलेल्या बेकायदेशीर गती रोधकांवर मोटरसायकल आदळून बालक खाली पडून जखमी झाला त्याला तातडीने धुळे येथे उपचारासाठी रवाना करण्यात आले. घटना घडताच स्थानिक नागरिकांसह काहींनी हे बेकायदेशीर गतिरोधक उखडून टाकले.हा रस्ता हायब्रीड ऍन्यूटी अंतर्गत असल्याने स्थानिक अधिकारी लक्ष देत नाही. देखभाल दुरुस्ती ठेकेदाराने केली पाहिजे मात्र दोन तीन घटना घडल्यानन्तर देखील निगरगट्ट ठेकेदार लक्ष द्यायला तयार नाही. यामुळे दोन्ही घटनांना जबाबदार म्हणून सार्वजनिक बांधकाम खाते आणि ठेकेदार याना जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी होत आहे.

# पोलीस असल्याचा बनाव करून मारहाण

## गोळी घालण्याची धमकी देणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पोलीस असल्याचे सांगत दुचाकीस्वारांना अडवून मारहाण करत गोळी घालून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या दोघांविरुद्ध अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दिनांक २३ रोजी रात्री १० वाजता मंगरूळ परिसरात घडली.शैलेश पुखराज पाटील (रा. स्वामी विवेकानंद कॉलनी, पैलाड भाग) हे २३ रोजी रात्री



आपल्या मित्रांसोबत मंगरूळ येथे जेवणासाठी जात असताना मागून येणाऱ्या चारचाकी (एमएच ०५ जीडी ९१२५ ) वाहनाने जोरजोरात हॉर्न वाजवला. त्यानंतर संबंधित वाहनाने पुढे जाऊन रस्ता अडवला. गाडीतून उतरलेल्या इसमांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. जाब विचारल्यावर चालकाने राहुल या मित्राला चापट-बुयांनी मारहाण केली, तर दुसऱ्या इसमाने शैलेश यांच्या छातीत बुक्का मारून डाव्या हाताच्या बोटांना चावा घेत जखमी केले. काही नागरिकांनी मध्यस्थी करून भांडण सोडवले.मात्र त्यानंतरही आरोपींनी दमबाजी करत गोळी घालून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच त्यांनी वाहन बाजूला लावून इतरांना बोलावून पुन्हा शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी शैलेश पाटील यांच्या फिर्यादीवरून अमळनेर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२ व ३५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास हेडकॉन्स्टेबल प्रमोद पाटील करीत आहेत.

# अमळनेर नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाला सलाम!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या काही दिवसापासून अमळनेर तालुक्यात शॉर्ट सर्किट किंवा शेताच्या बांधावर कचरा जाळताना आग पसरून शेजारच्या शेताना आग लागण्याच्या घटना घडल्या असून २२ आणि २३ रोजी तर तालुक्यात पाच ठिकाणी आगी लागल्या. लोण पंचम रणाईचे, मंगरूळ , परत रणाईचे ,झाडी आदी ठिकाणी आगी लागून मका ,चारा ,ठिबक नळ्या ,पाईप , शेती साहित्य जळाले.

वाढती उष्णता , शेतकऱ्यांचा



निष्काळजीपणा , वीज मंडळाचे दुर्लक्ष गलथान पणा किंवा बिडी सिगारेट ओढणाऱ्यांची बेपर्वाई यांच्यामुळे आगी लागल्या.

मात्र खरी कसरत आणि मेहनत आहे अमळनेर नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाची आहे. प्रचंड उष्णता त्यात आगीच्या ज्वाला अशात धाडस करून आग विझवतात. मंगरूळ ला सकाळी ११ वाजता शेतात आग लागली धावपळ करत अग्निशमन दलाने उन्हात आग विझवली परत आले गाडीत पाणी भरले दोन घास पोटात टाकत नाही तोपर्यंत रणाईचे येथे शेतात आग लागली कशाचीही पर्वा न करता कडक उन्हात धावपळ करीत रणाईचे गाठले आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. परत आले तत्परता म्हणून गाडीत पाणी भरले आणि सायंकाळी झाडी येथे आग लागली पुन्हा धावपळ आग विझवण्यासाठी तीच तत्परता अमळनेर नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाच्या प्रत्येक कर्मचाऱ्याला सलाम !

## दिनविशेष
२६ एप्रिल

- द बॉम्बे गॅझेट या इंग्रजी वृत्तपत्राची मुंबईत स्थापना झाली आणि ती प्रथम रेशमी कापडावर प्रकाशित झाली
- अजित नाथ रे भारताचे 14 वे सरन्यायाधीश बनले.
- भारताच्या निशा मोहोता हिने आशियाई प्रादेशिक बुद्धिबळ स्पर्धेत आंतरराष्ट्रीय महिला मास्टर विजेतेपद पटकावले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
**जय स्वदेशी...!!**

# आरबीआयकडून पेटीएम पेमेंट्स बँकचा परवाना रद्द

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारतीय डिजिटल पेमेंट क्षेत्रात मोठी खळबळ उडवणारी घटना समोर आली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने पेटीएम पेमेंट्स बँकचा बँकिंग परवाना रद्द केल्याची माहिती समोर येत आहे. २४ एप्रिल २०२६ पासून ही कारवाई लागू करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.आरबीआयने केलेल्या निरीक्षणानुसार, पेटीएम पेमेंट्स बँककडून ठेवीदारांच्या हितास बाधा येईल अशा पद्धतीने व्यवहार करण्यात आल्याची नोंद करण्यात आली आहे. तसेच बँकिंग नियमांचे पालन करण्यात




झालेल्या त्रुटींमुळे ही कठोर कारवाई करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अखेर आरबीआयने निर्णायक पाऊल उचलत पेटीएम पेमेंट्स बँकवर कारवाई केली आहे. यामुळे डिजिटल पेमेंट क्षेत्रात मोठा धक्का बसला असून ग्राहक आणि गुंतवणूकदारांमध्ये चिंता वाढली आहे. भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे पेटीएम हे ऑनलाइन पेमेंट प्लॅटफॉर्म असून दुकानदार, हॉटेल्स तसेच लहान व्यावसायिकांमध्ये याचा व्यापक वापर आहे. त्यामुळे या निर्णयाचा थेट परिणाम लाखो वापरकर्त्यांवर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, बँकिंग परवान्याचे नियम आणि नियामक अटींचे पालन करण्यात अपयश आल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे. या निर्णयाचा परिणाम शेअर बाजारावरही दिसून येण्याची शक्यता आहे.

# जळगाव-दिल्ली विमानसेवा प्रायोगिक तत्त्वावर

## २ मेपासून सुरू : खासदार स्मितताई वाघ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जळगाव : जळगावकरां-साठी दीर्घ प्रतीक्षेचा अंत झाला आहे. जलसंपदा मंत्री ना.गिरिषभाऊ महाजन तसेच केंद्रीय मंत्री रक्षाताई खडसे यांच्या सहकार्याने आणि खासदार स्मिताताई वाघ यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे तसेच आमदार राजूमामा भोळे यांच्या मागणीनुसार ॲलियन्स एअर कंपनीची दिल्ली-इंदूर-जळगाव व जळगाव -इंदूर-दिल्ली ही विमानसेवा २ मे २०२६ पासून प्रायोगिक तत्त्वावर सुरू होत आहे. ही सेवा मंगळवार, गुरुवार आणि शनिवार (त्रि-साप्ताहिक) असे दिवशी चालवली जाणार आहे.या सेवेमुळे जळगाव येथील प्रवाशांना दिल्लीसह उत्तर भारतातील विविध शहरांशी थेट व सुसंगत हवाई जोडणी उपलब्ध होणार आहे. तिकीट भाडे ३ हजार रुपये पासून सुरू होत असल्याने सामान्य प्रवाशांसाठीही ही सेवा परवडणारी ठरेल. बुकिंग्स सध्या सुरू झालेल्या आहेत.

### दिल्ली-इंदूर-जळगाव या मार्गावरील विमान वेळापत्रक

* दिल्ली प्रस्थान दुपारी ०४.५० * इंदूर आगमन सायंकाळ ०६.५० * इंदूर प्रस्थान सायंकाळ ०७.१५ * जळगाव आगमन सायंकाळ ०७.५५

* जळगाव प्रस्थान सायंकाळ ०८.२० * इंदूर आगमन सायंकाळ ०९.०० * इंदूर प्रस्थान रात्री .९.२५ * दिल्ली आगमन रात्री ११.३० ही विमानसेवा जळगावकरांसाठी दिल्लीशी थेट कनेक्टिव्हिटी वाढवणारी एक महत्त्वाची सुविधा आहे.





खासदार स्मिताताई वाघ यांनी जळगाव विमानतळावर नियमित विमानसेवा सुरू करण्यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून केंद्र सरकार, नागरी विमान वाहतूक मंत्रालय आणि संबंधित विमान कंपन्यांशी सतत संपर्क साधला होता. त्यांच्या या अथक प्रयत्नांमुळे अखेर ही प्रायोगिक सेवा मंजूर झाली आहे. या सेवेमुळे जळगावकरांना दिल्ली, इंदूर येथे जाणे-येणे सोयीचे होणार असून, उत्तर भारतातील धार्मिक, व्यावसायिक आणि शैक्षणिक प्रवास मोठ्या प्रमाणात वाढण्याची अपेक्षा आहे. प्रायोगिक कालावधी (१ मे ते ३१ मे) यशस्वी झाल्यास नियमित व विस्तारित सेवा सुरू होण्याची शक्यता आहे.जळगाव विमानतळाचे महत्त्व वाढवणारी ही सेवा जिल्ह्याच्या विकासात एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे स्थानिक उद्योगपती आणि प्रवासी संघटनांनी व्यक्त केले आहे.

# संत सखाराम महाराज यात्रोत्सवात सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना

**पत्रकारपरिषदेतून....**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील खानदेशातील शेवटची यात्रा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमळनेर येथील श्री संत सखाराम महाराजांच्या यात्रा उत्सवाची तयारी चांगलाच वेग लागला असून परराज्यातील व्यावसायिक त्या ठिकाणी दाखल झाले आहेत. यंदाही हा उत्सव पारंपारिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. जरी दिवसा तापमान अधिक असले तरी सायंकाळी यात्रेचा उत्साह ओसंडून वाहत असतो.

मागील वर्षाप्रमाणे यंदाही सुरक्षेच्या दृष्टीने रथ ट्रॅक्टरच्या सहाय्याने ओढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात्रेत विविध पारंपारिक कार्यक्रमांसोबत काही नवे उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. यात्रा रात्री एक वाजेपर्यंत सुरू राहणार असून, त्यानंतर तात्काळ साफसफाई केली जाणार आहे, जेणेकरून दुसऱ्या दिवशी नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही.

यात्रेदरम्यान चार ते पाच ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच, सुरक्षेसाठी नगरपालिकेचे तसेच वाडी संस्थानचे सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असतील यात्रेत पारंपारिक कीर्तन, प्रवचन, अन्नदान यांसारखे धार्मिक कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रम आनंदात पार पाडावा. आध्यात्मिक आनंद घ्यावा आणि संत सखाराम महाराजांचा आशीर्वाद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरवर्षी यात्रेत सहभागी होणाऱ्या दिंड्यांची संख्या उन्हाच्या तीव्रतेनुसार कमी-जास्त होत असते. काही दिंड्या मुक्कामी थांबत असून, त्यांच्या निवासाची योग्य व्यवस्था करण्यात आली आहे. साधारणतः ४० ते ५० लहान-मोठ्या दिंड्या यात्रेत सहभागी होतात. रथोत्सवाच्या दिवशी सुमारे दीड लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता असून, पाच दिवसांत तीन लाखांहून अधिक भाविक यात्रेला भेट देतात. यावर्षी हवामान अनुकूल राहिल्यास भाविकांची संख्या वाढण्याची शक्यता असून, पाणीपुरवठा सुरळीत राहिल्यास यात्रा अधिक यशस्वी होईल, असेही नमूद करण्यात आले. ही माहिती आज वाडी संस्थान येथे आयोजित पत्रकार परिषदेत परमपूज्य प्रसाद महाराज यांनी दिली.

## संपादकीय

# रेल्वेचे विस्तारणारे जाळे

भारतात दररोज २५,००० पेक्षा जास्त रेल्वेगाड्या धावतात. या गाड्या दररोज २० दशलक्षाहून अधिक प्रवाशांना घेऊन जातात आणि १,३७,००० किमी पेक्षा जास्त पसरलेल्या रेल्वे जाळ्यावरून मोठ्या प्रमाणात कोळसा, लोहखनिज, धान्य, पोलाद, सिमेंट आणि इतर वस्तूंची वाहतूक करतात. या प्रणालीचा पाया रेल्वे रुळ आहे. जेव्हा रुळ चांगल्या स्थितीत असतो, तेव्हा गाड्या सुरक्षितपणे उच्च वेगाने धावू शकतात. जेव्हा रुळ खराब स्थितीत असतो, तेव्हा वेगमर्यादा, विलंब आणि सुरक्षेचे धोके निर्माण होतात. रुळाला पडलेली भेग, एखादा सैल झालेला भाग किंवा खडीच्या थरातील भेग या सर्वांचा गाडीच्या वेगावर परिणाम होऊ शकतो.रेल्वे रुळांचे महत्त्व ओळखून, भारतीय रेल्वेने गेल्या काही वर्षांत एक व्यापक आधुनिकीकरण कार्यक्रम हाती घेतला आहे. या कामामध्ये आधुनिक यंत्रसामग्रीद्वारे रुळांचे नूतनीकरण, प्रगत चाचणी आणि तपासणी पद्धती, यांत्रिक देखभाल आणि सुरक्षा कुंपण यांचा समावेश आहे. या प्रयत्नांमुळे रेल्वे जाळ्यामध्ये लक्षणीय बदल झाला आहे.२०१४ पासून, अंदाजे ५५,००० किमी रुळांचे नूतनीकरण करण्यात आले आहे, ज्यामुळे सुरक्षितता आणि प्रवासाचा दर्जा सुधारला आहे आणि वारंवार दुरुस्तीची गरज कमी झाली आहे. सुमारे ४४,००० किमी लांबीच्या रेल्वेमार्गांचे २६० मीटर लांबीच्या रेल पॅनेलने नूतनीकरण करण्यात आले आहे. लांब पॅनेलमुळे जोड कमी होतात, ज्यामुळे रेल्वेची वाहतूक अधिक सुरळीत आणि सुरक्षित होते. आता ८०,००० किमी पेक्षा जास्त लांबीच्या रेल्वेमार्गांवर अधिक मजबूत ६० किलोग्राम वजनाच्या रुळांचा वापर केला जात आहे, ज्यामुळे जास्त भार वाहून नेण्याची क्षमता आणि अधिक वेग सुनिश्चित होतो.

अधिक मजबूत रूळ टाकणे महत्त्वाचे असले तरी, दोष लवकर शोधणे देखील आवश्यक आहे. लपलेल्या भेगा शोधण्यासाठी अल्ट्रासोनिक चाचणीचा वापर केला जातो. सुमारे ३६.२ लाख किमी रेल्वेमार्ग आणि २.२५ कोटी वेल्ड्सची तपासणी करण्यात आली आहे. यामुळे रूळ आणि वेल्ड तुटण्याच्या घटनांमध्ये सुमारे ९० टक्यांनी घट झाली आहे. याचा अर्थ असा की, दोष निर्माण झाल्यावर त्यांची दुरुस्ती करण्याऐवजी, ते शोधले जातात आणि टाळले जातात. रेल्वेवर इतर आधुनिक चाचणी तंत्रांचाही वापर केला जात आहे. नवीन वेल्ड्सची तपासणी करण्यासाठी चुंबकीय प्रोब्स, फ्लॅश-बट वेल्ड्सची तपासणी करण्यासाठी नवीन यंत्रे आणि रेल्वेच्या प्रवासाची गुणवत्ता मोजणारी व सदोष भाग निश्चित करणारी जीपीएस-सक्षम प्रणाली विकसित करण्यात आली आहे.भारतीय रेल्वेच्या ट्रॅक मशिन्सची संख्या २०१४ मधील ७४८ वरून २०२६ पर्यंत १७८५ पर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. या मशिन्स मानवी कामापेक्षा अधिक वेगाने, चांगल्या प्रकारे आणि अधिक सातत्यपूर्णपणे ट्रॅकची दुरुस्ती, खडीची साफसफाई आणि इतर कामे करतात. ट्रॅकखालील खडीचा थर स्वच्छ करण्यामध्ये मशिन्समुळे लक्षणीय फरक पडला आहे, ज्यामुळे पाणी काढून टाकण्यास, कंपने कमी करण्यास आणि ट्रॅकची मजबुती टिकवून ठेवण्यास मदत होते. ट्रॅकच्या पृष्ठभागावरील दोष दूर करण्यासाठी १,००,००० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीच्या रेल्वे संरचनेला ग्राइंडिंग (घासून सपाट करणे) देखील करण्यात आले आहे.यामुळे रेल्वे प्रवास अधिक आरामदायक आणि सुरक्षित झाला आहे. दरवर्षी गाड्यांची संख्या वाढत असल्याने, देखभालीसाठी उपलब्ध वेळ कमी होत आहे. अशा परिस्थितीत, मशिन्सच्या मदतीने कमी वेळेत अधिक काम करता येते आणि रेल्वे सेवांवर कोणताही परिणाम होत नाही. सुरक्षा केवळ ट्रॅकवरच नव्हे, तर जिथे गाड्या मार्ग बदलतात तिथेही महत्त्वाची आहे. त्यामुळे, भारतीय रेल्वेने ट्रॅक बदलण्याव्यतिरिक्त इतर अनेक सुधारणा लागू केल्या आहेत. सुमारे १७,५०० किलोमीटर लांबीच्या ट्रॅकवर, विशेषतः ज्या ठिकाणी गाड्या ताशी ११० किलोमीटरपेक्षा जास्त वेगाने धावतात, तिथे सुरक्षा कुंपण लावण्यात आले आहे. यामुळे माणसे आणि प्राणी रेल्वे रुळ ओलांडण्याच्या घटना कमी होतात.

जिथे गाड्या एका मार्गावरून दुसऱ्या मार्गावर जातात, तिथे ३६,००० नवीन आणि अधिक मजबूत स्विच बसवण्यात आले आहेत, आणि ७,५०० विशेष क्रॉसिंग उभारण्यात आले आहेत. हे अधिक काळ टिकतात आणि गाड्यांना धक्के न लागता जाण्याची परवानगी देतात. २०१९ पासून, अधिक रुंद आणि जड स्लीपर बसवण्यात आले आहेत, ज्यामुळे रुळ अधिक मजबूत झाले आहेत, विशेषतः उन्हाळ्यात. पुलांवरही अधिक मजबूत स्लीपर बसवण्यात आले आहेत, आणि यार्डमध्ये अधिक लांब वेल्डेड ट्रॅक टाकण्यात आले आहेत. यामुळे संपूर्ण रेल्वे नेटवर्क आणखी मजबूत झाले आहे. रेल्वे ट्रॅकच्या आधुनिकीकरणाचा सर्वात स्पष्ट परिणाम म्हणजे गाड्यांचा वेग वाढवण्याची क्षमता. ताशी १३० किमी किंवा त्याहून अधिक वेगासाठी डिझाइन केलेल्या रेल्वे ट्रॅकचा वाटा पूर्वीच्या केवळ ६ टक्यांवरून वाढून जवळपास २३ टक्के झाला आहे. त्याचप्रमाणे, ताशी ११० किमी किंवा त्याहून अधिक वेगासाठी सक्षम असलेल्या ट्रॅकचा वाटा पूर्वीच्या सुमारे ४० टयांवरून वाढून ८० टयांवर पोहोचला आहे.या सर्व सुधारणांचा परिणाम दिसून येत आहे. २०१४-१५ मध्ये १३५ मोठे रेल्वे अपघात झाले होते, परंतु २०२५-२६ पर्यंत ही संख्या केवळ १६ पर्यंत कमी होण्याचा अंदाज आहे. बारा वर्षांपूर्वी, भारतातील ६० टक्के रेल्वे मार्गांवर ताशी ११० किमी पेक्षा कमी वेगमर्यादा होती. रेल्वे रुळ निकामी होणे ही एक सामान्य गोष्ट होती आणि बहुतेक देखभाल हाताने केली जात असे. आता, जवळपास ८० टक्के रेल्वे नेटवर्क ताशी ११० किमी किंवा त्याहून अधिक वेग हाताळू शकते.रेल्वे रुळ आणि वेल्डिंगमधील बिघाड ९० टयांनी कमी झाले आहेत आणि अंदाजे १,८०० ट्रॅक मशिन्स कार्यरत आहेत. रेल्वेने आता 'ट्रॅक मॅनेजमेंट सिस्टीम' नावाची एक नवीन ऑनलाइन प्रणाली सुरू केली आहे. ही प्रणाली ट्रॅक तपासणी, रेल्वे प्रवासाचा दर्जा आणि ट्रॅकची स्थिती यासंबंधीची सर्व माहिती एकाच ठिकाणी एकत्र आणते. यामुळे रेल्वेला कोणत्या ठिकाणी काम करणे आवश्यक आहे, हे त्वरीत ओळखता येते. या बदलांचा रेल्वे मालवाहतुकीवर अवलंबून असलेल्या लाखो प्रवाशांवर आणि व्यवसायांवर महत्त्वपूर्ण परिणाम झाला आहे. प्रवासाचा वेळ कमी झाला आहे आणि रेल्वे नेटवर्क अधिक विश्वासार्ह झाले आहे. आतापर्यंत झालेली प्रगती हे दर्शवते की, सातत्यपूर्ण कठोर परिश्रम आणि गुंतवणुकीने किती मोठा बदल शक्य आहे.



# “तुम्हे याद करते करते!”

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्यांना एक महानतम व दर्जेदार 'संगीतकार जोडी' म्हणून मान्यता मिळाली, ज्या जोडीने सन १९४९ ते १९७१ या काळात १७० हिंदी सिनेमांना सुमधूर संगीत दिले, विशेष म्हणजे त्यांनी ऑर्केस्ट्रा या संकल्पनेला व्यापक स्वरूप देऊन एकावेळी १०० वादकांसोबत संगीत निर्मिती केली! त्यांनी रागावर आधारित, तसेच लोकसंगीत व पाश्चात्य संगीताचा सुंदर 'संगम' साधल्यामुळे, त्यांची गाणी प्रचंड लोकप्रिय झाली. अक्षरशः देश-विदेशात देखील, त्यांच्या गाण्यांनी मान्यता मिळविली. ती संगीतकार जोडी म्हणजे एस.जे.अर्थात 'शंकर-जयकिशन'! यापैकी स्व. शंकरसिंग रामासिंग रघुवंशी यांचा आज (२६ एप्रिल) स्मृतिदिन!

१५ ऑक्टोबर १९२२ रोजी जन्मलेले शंकरजी हे उत्कृष्ट तबलावादक होते. पृथ्वी थिएटरमध्ये तबला साथ करतानाच ते सितार, ॲकॉर्डियन, पियानो व इतर वाद्य वाजवायला शिकले. याशिवाय, त्याकाळची प्रमुख संगीतकार जोडी, “स्व. हुस्नलाल-भगतराम” यांचे सहाय्यक म्हणून देखील काम केले.

शंकरजी नेहमी गुजराती दिग्दर्शक चंद्रवदन भट्ट यांच्या कार्यालयात जात असत. तसेच जयकिशनजींचे देखील येणे जाणे होते. त्याठिकाणी दोघांची भेट झाली. जयकिशन यांना शंकरजी पृथ्वी थिएटरमध्ये घेऊन आले. तिथेच त्यांची घट्ट मैत्री झाली. त्या दोघांनी 'पृथ्वीच्या' काही महत्त्वपूर्ण नाटकांमध्ये भूमिका देखील केल्या. उदा. पठाण! जयकिशन स्वतः हार्मोनियम उत्तम वाजवत असत. त्यांनी शास्त्रीय संगीताची शिक्षा आत्मसात केली होती.

पृथ्वी थिएटरमध्ये, गीतांची धून तयार करून 'राज कपूर' या नवख्या अभिनेत्याला ते ऐकवत असत. जो प्रसिद्ध दिग्दर्शक 'केदार शर्मा' यांचा सहाय्यक म्हणून कार्यरत होता. अशा रीतीने या उमद्या कलाकारांची भेट झाली, नंतर या तिघांनी हिंदी सिनेसृष्टीत इतिहास घडवला व अनेक रेकॉर्ड केले.

सन १९७१ मध्ये, वयाच्या अवघ्या ४८ व्या वर्षी, जयकिशनजींचे दुर्दैवाने निधन झाले. त्यामुळे शंकरजी एकटे पडले. शंकरजी हे म. प्रदेश व आंध्र प्रदेशाशी संबंधीत, तर जयकिशन हे गुजरातचे! दोघांची संस्कृती भिन्न असली तरी, त्यांची संगीतशैली एकमेकांना पूरक होती.

ही जोडी अशी होती. त्यामुळेच ते इतका दीर्घकाळ, चित्रपटसृष्टीवर 'अनभिषिक्त' राज्य करू शकले. त्यांनी प्रस्थापित संगीत रचनेच्या पद्धतीला छेद दिला. १०० वादकांचा ताफा घेऊन गाणी रेकॉर्ड करण्याची पद्धत सुरू केली. गाण्यातील मुख्य मेलडीच्या बरोबरीने 'काऊंटर' मेलडी वापरण्याचा पहिला प्रयोग त्यांनीच केला, जो आजही रूढ आहे. सोबत पाश्चात्य वाद्यांचा वापर देखील अत्यंत खुबीने केला!

जयकिशनजींच्या मृत्यूनंतर शंकरजींना त्यांचे अनेक निर्माते सोडून गेले. जयकिशनजींचा स्वभाव मृदू होता आणि त्यांचा जनसंपर्क दांडगा होता. त्यामुळे ते सिनेसृष्टीत लोकप्रिय होते. शंकरजी मात्र स्वभावाने फटकळ होते. मनात येईल ते स्पष्टपणे सुनावणारे होते. परिणामी या जोडीचे बरेच चित्रपट दुसऱ्या संगीतकारांकडे गेले. पण शंकरजी हार मानणाऱ्यांपैकी नव्हते! १९७१ नंतर, त्यांच्या मृत्यूपूर्वी म्हणजे २६ एप्रिल १९८७ पर्यंत त्यांनी तब्बल ६३ चित्रपटांना संगीत दिले. यातील ८-१० चित्रपट जयकिशन असताना रेकॉर्ड झाले होते. पण उर्वरित शंकरजींनी एकट्याने केले. पण ते करताना श्रेयनामावलीत 'शंकर-जयकिशन' हेच नाव त्यांनी कायम ठेवले!

शंकरजींना शास्त्रीय संगीताचे उत्तम ज्ञान होते. त्यामुळे त्यांची शास्त्रीय रागाधारीवर आधारित गाणी उठावदार होत असत! उदा. 'छम छम बाजे रे पायलिया' (मन्ना डे - जाने अनजाने), 'जुल्फें में गजरा मत बांधो' (रफी - धूप छाँव), 'थिरका बदन तो' (लता, आशा - दामन और आग), 'होने लगी है रात' (आशा - नैना) वगैरे. त्या काळातील ही गाणी आजही ऐकावीशी वाटतात!

या जोडीची गाणी ऐकताना एक गोष्ट लक्षात येते की, वरवर ही गाणी सोपी वाटतात, पण लक्षपूर्वक ऐकली की, त्यांच्या दैवी प्रतिभेपुढे मान झुकवून त्रिवार मुजरा करावासा वाटतो. त्यांची गाणी गाताना गायकाचा कस लागतो. लता, आशा, रफी, मन्ना डे, मुकेश, शारदा, महेंद्र कपूर या गायकांनी त्यांची गाणी अमर केली. त्यांच्या नॉर्मल पिचपेक्षा वरच्या पट्टीत एस.जे.नी गाऊन घेतलं! उदा. सोहनलाल कँवर यांच्या १९७५ वर्षात आलेल्या 'सन्यासी' चित्रपटातील गाणी! एकूण नऊ गाणी शंकरजींनी भैरवी रागात बांधली आहेत. ही अजोड कामगिरी त्यांनी केलीय. गाणीच नाही तर शीर्षक संगीतही भैरवी रागावर रचले होते. पण तरीही या गाण्यांमध्ये तोच-तोचपणा जाणवत नाही. यातील लता-मुकेश यांची गाणी खूप प्रसिद्ध झाली. विशेष म्हणजे या दोघांकडून शंकरजींनी ही गाणी काही प्रमाणात वरच्या पट्टीत गाऊन घेतली, त्यामुळे ही गाणी खूप गोड वाटतात!

स्व. शंकरजी व स्व. जयकिशन दयाभाई पांचाळ या जोडीने अंदाजे १३०० ते १४०० गाणी बनविली. स्व. जयकिशन यांना व भारतरत्न स्व. लता दीदी यांचा जन्म एकाच वर्षाचा, सन १९२९! स्व. जयकिशन यांचा जन्म ०४ नोव्हेंबर १९२९ आणि स्व. दीदींचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ चा. किती सुरेख व विलक्षण योगायोग आहे हा! दोघांनी संगीत क्षेत्रात क्रांती घडवली आणि आम्हा रसिकांना सुमधूर व आठवणीत राहणारी गाणी देऊन गेले. हा खरोखर माहेचा (महिम्याचा) करिश्मा तर नव्हे?

इतकी अविस्मरणीय, अप्रतिम व अवीट चालीची गोड गाणी दिल्याबद्दल एस.जे. १९५३ ते १९७६ या काळात २० वेळा 'Best Music Director' म्हणून फिल्मफेअर पुरस्कारासाठी नामांकन झाले. विशेष बाब म्हणजे १९५८, १९६८ व १९७४ सोडून, दरवर्षी ते नामांकन झाले. शेवटची ३ वर्षे (१९७१, ७२ व ७३) तर अक्षरशः या जोडीने हॅट-ट्रिक केली. हे एकमेव उदाहरण आहे. या अत्यंत सुरमयी कारकिर्दीबद्दल स्व. शंकरजींना १९६८ मध्ये भारत सरकारने 'पद्मश्री' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. सर्व संगीतप्रकार या जोडीने अत्यंत कुशलतेने हाताळले. त्यांच्याकडे गोड व कर्णमधूर चालींनी पुरेपूर भरलेले एक भांडार होते. 'भैरवी' हा राग तर जणू त्यांची 'आवडती सखी' होती. सुमारे ३ दशके त्यांनी सतत ऐकावीशी वाटणाऱ्या गीतांची जणू बरसात केली आणि त्यात संगीतप्रेमींना स्वरधारांनी भिजविले! स्व. शंकरजींचा शेवटचा चित्रपट १९७९ मधील 'संतोष' ठरला.

या जोडीपूर्वी त्यांच्याइतकी वैविध्यपूर्ण सृजनशीलता असणारा कोणी संगीतकार झाला नाही. त्यांच्यांनंतर त्यांच्या जवळपास फक्त दोनच संगीतकार जाऊ शकले, ते म्हणजे आर. डी. बर्मन व लक्ष्मीकांत प्यारेलाल!

शंकरजींना जाऊन या महिन्यात ३९ वर्षे पूर्ण होत आहेत. पण शंकर-जयकिशनच्या अमर संगीताचे गारुड आजही मनावरून उतरत नाही, हेच खरं! ज्यांच्या अजरामर सुरांनी आयुष्याला अर्थ दिला, हृदयाला स्पर्श केला, त्यांचे सूर आजही जिवंत आहेत, त्या अमर सुरांना संगीतमय आदरांजली!

**शरद आ. सोनवणे**
मो. ९४२०१ ०८३०५

## जयनिल फाऊंडेशनची स्थापना

# 'स्वराज्य रक्षक छत्रपती शंभू राजे' महानाट्याने शुभारंभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



*अमळनेर : पत्रकारपरिषदेत माहिती देताना गौतम पाटील, शेजारी नयना कुलकर्णी व राकेश राजपूत. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)*

अमळनेर : सामाजिक गरजा आणि उणिवा पूर्ण करण्यासाठी जयनिल फाऊंडेशनची स्थापना करण्यात आली असून १४ मे रोजी छत्रपती संभाजी राजेंच्या जयंतीनिमित् संस्थेच्या कार्याचा प्रारंभ म्हणून संस्कृती फौंडेशन च्या मदतीने “स्वराज्य रक्षक छत्रपती शम्भू राजे” महानाट्य आयोजित करण्यात आले आहे अशी माहिती आमदार अनिल पाटील व माजी नगराध्यक्ष जयश्री पाटील यांचे सुपुत्र गौतम पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. समाजकारणाचा राजकारणाशी काही एक संबंध नसला तरी समाजकारणासाठी राजकारणात उतरावे लागले तर निश्चित राजकारणात येईल असेही त्यांनी आवर्जून सांगितले. गौतम पाटील पुढे म्हणाले की तालुक्यातील गरजू गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अडचणी असतील तर त्यांना मदत करणे , सर्वे करून सामाजिक गरजा पूर्ण करणे , तरुणांना रोजगार देण्यासाठी रोजगार मेळावे घेणे , व्यक्तिमत्व विकास घडवणे हा जयनिल फाऊंडेशनचा उद्देश असेल.

अमळनेर शहरात १४ मे रोजी २५० कलाकारांचे संभाजी महाराजांचे शौर्य आणि बलिदानाची गाथा या महानाट्यातून सादर होणार आहे. संस्कृती फाऊंडेशन तर्फे सात्विक ठकार लिखित राकेश राजपूत दिग्दर्शित या महानाटकात उत्तर महाराष्टारतील कलाकार असतील. ज्या कलाकारांना व्यासपीठ मिळत नाही अथवा परिस्थितीमुळे मिळू शकले नाही त्यांना संधी देण्याचा संस्कृती फाऊंडेशनचा उद्देश आहे. अमळनेर पूर्वी नंदुरबार, धुळे आदी ठिकाणी तीन प्रयोग झाले असून अमळनेरात चवथा आणि पाचवा प्रयोग होणार आहे. अशी माहिती कलाकार निकेश राजपूत यांनी पत्रकार परिषदेत दिली. जयनिल फौंडेशनच्या मिळालेल्या देणगीतून महानाट्य होणार आहे. संस्थेला झालेल्या नफ्यातून जळगाव व अमळनेर येथे संस्कृती कला विद्यालय स्थापन करण्यात येणार आहे. त्यात स्थानिक कलाकारांना अभिनय ,व्यक्तिमत्व विकास , स्वसंरक्षणचे धडे दिले जाणार आहेत असेही सांगितले. पत्रकार परिषदेस नयना कुलकर्णी सह संस्कृती फाउंडेशनचे कलाकार हजर होते.

# अमळनेरात २७ एप्रिलला भव्य गौसन्मान रॅली..

## गोसंरक्षणासाठी करणार विविध मागण्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गौमातेला तिचा योग्य सन्मान मिळावा या उद्देशाने गौसन्मान आवाहन अभियान अंतर्गत अमळनेर शहरात रविवारी दिनांक २७ एप्रिल रोजी भव्य गौसन्मान रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

या रॅलीसाठी शहरात आणि तालुक्यात जय्यत तयारी सुरू असून शेकडो गोसेवक कार्यरत आहेत. विविध ठिकाणी जनजागृतीसाठी फलक लावण्यात आले असून मंडळे, संस्था, मित्र मंडळे तसेच महिला मंडळांना निमंत्रण देण्यात येत आहे. या रॅलीद्वारे गोहत्या बंदीसाठी देशभर एकच कडक कायदा लागू करावा, गौमातेला राष्ट्रमाता घोषित करावे, केंद्रीय गोसेवा व संरक्षण कायदा लागू करावा, सर्व कत्तलखान्यांचे परवाने रद्द करावेत तसेच स्वतंत्र केंद्रीय गौ मंत्रालय स्थापन करावे अशा विविध मागण्या करण्यात येणार आहेत. ही रॅली सकाळी १० वाजता संकटमोचन हनुमान मंदिर, प्रताप मिल कंपाऊंड येथून प्रारंभ होऊन तहसील कार्यालय, अमळनेर येथे समाप्त होणार आहे. गौमातेवर श्रद्धा असलेल्या सर्व हिंदू बांधवांनी या रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन गौसन्मान आवाहन अभियानतर्फे करण्यात आले आहे.

# दहावी उत्तीर्ण : सीआरपीएफमध्ये संधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : केंद्रीय राखीव पोलीस दलामध्ये (सीआरपीएफ) एकूण ९,१९५ रिक्त पदांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. या भरतीसाठी किमान दहावी उत्तीर्ण उमेदवार पात्र ठरणार असल्याने ग्रामीण व शहरी भागातील तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. कॉन्स्टेबल (तांत्रिक व ट्रेड्समन) या पदांर्तगत ही भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यामध्ये ड्रायव्हर, मोटार मेकॅनिक, कुक, वॉटर कॅरियर, वेल्डर, सुतार, शिंपी, न्हावी, धोबी तसेच सफाई कर्मचारी अशा विविध पदांचा समावेश आहे. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने सुरू झाली असून, २० एप्रिलपासून अर्ज सादर करण्यास सुरुवात झाली आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख १९ मे निश्चित करण्यात आली आहे. उमेदवारांनी rect.crpf.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करून अर्ज भरावा.

# २६ एप्रिल या मोसमातील सर्वाधिक उष्ण दिवस ठरणार


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २६ एप्रिल रोजी जळगाव जिल्ह्यातील पारा ४४ अंश सेल्सिअसच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपासून अमळनेरचे तापमान ४० अंशांच्या वरच स्थिरावलेले आहे. शनिवारी अमळनेरचा पारा ४२ अंशांवर नोंदवला गेला होता.रात्रीच्या तापमानातही मोठी वाढ होऊन ते २५ ते २८ अंशांच्या दरम्यान राहणार आहे. त्यामुळे सूर्यास्तानंतरही उकाड्यापासून कोणताही दिलासा मिळणार नाही.उत्तर भारतात सक्रिय असलेल्या उच्च दाबाच्या पट्ट्यामुळे ढग गायब झाले असून सूर्याची किरणे थेट जमिनीवर येत आहेत.हवेतील आर्द्रता केवळ १५ ते २५ टक्क्यांवर आल्याने हवा अत्यंत कोरडी झाली आहे.

ताशी १५ किमी वेगाने वाहणारे पश्चिमेकडचे वारे 'लू'सारखे गरम चटके देत आहेत.सध्या पावसाची शक्यता केवळ १० टक्के इतकी कमी आहे, त्यामुळे उष्णतेच्या लाटेतून दिलासा मिळण्याची चिन्हे नाहीत.ही उष्णतेची लाट धोकादायक ठरू शकते, त्यामुळे खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे.दुपारची वेळ १२ ते ४ या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे.पुरेशा प्रमाणात पाणी प्या. लिंबू पाणी, ओआरएस किंवा ताक यांसारख्या पेयांचा वापर करा. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा. सैल आणि सुती कपडे वापरा.चक्कर येणे, खूप थकवा किंवा मळमळणे अशी लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधा.ही स्थिती पुढील काही दिवस कायम राहण्याची शक्यता आहे, त्यामुळे प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करून स्वतःची काळजी घ्या.

# गणितातील एक 'ऋषी' : श्रीनिवास रामानुजन



**स्मृतिदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय गणिती परंपरेतील एक तेजस्वी तारा, ज्यांनी जगाला गणिताकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली, ते म्हणजे श्रीनिवास रामानुजन. अवघ्या ३२ वर्षांच्या अल्पायुष्यात त्यांनी गणिताच्या क्षेत्रात जी किमया केली, ती आजही संशोधकांना थक्क करणारी आहे. त्यांच्या निधनानंतर इतकी वर्षे उलटूनही, त्यांचे कार्य आजही गणिताच्या प्रगतीचा आधारस्तंभ मानले जाते.२२ डिसेंबर १८८७ रोजी तामिळनाडूतील इरोड येथे एका सामान्य कुटुंबात रामानुजन यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांना गणिताची विलक्षण ओढ होती. औपचारिक शिक्षण पूर्ण झाले नसतानाही, केवळ स्वतःच्या जिज्ञासेच्या जोरावर त्यांनी गणितातील क्लिष्ट कोडी सोडवण्यास सुरुवात केली होती. त्यांची बुद्धिमत्ता इतकी तल्लख होती की, ते स्वतःच नवनवीन सिद्धांत मांडत असत.रामानुजन यांच्या आयुष्याला खरी कलाटणी मिळाली जेव्हा त्यांनी केंब्रिज विद्यापीठातील प्रसिद्ध गणितज्ञ जी. एच. हार्डी यांच्याशी पत्रव्यवहार सुरू केला. हार्डी यांनी रामानुजन यांची प्रतिभा ओळखली आणि त्यांना इंग्लंडला बोलावून घेतले. तिथल्या प्रतिकूल हवामानात आणि कठीण काळातही रामानुजन यांनी आपले संशोधन सुरूच ठेवले. त्यांनी 'इन्फिनिट सिरीज', 'कंटिन्युड फ्रॅक्शन्स', 'नंबर थियरी' आणि 'ॲनालिसिस' या विषयांत मोलाचे योगदान दिले.रामानुजन यांची सर्वात मोठी शक्ती म्हणजे त्यांची अंतर्ज्ञान शक्ती ते म्हणत असत की, त्यांना त्यांची गणिते स्वप्नात किंवा देवतेच्या कृपेने सुचत असत. आजही 'रामानुजन नंबर' (१७२९), ज्याला 'हार्डी-रामानुजन नंबर' म्हणून ओळखले जाते, हे त्यांच्या गणितातील रुचीचे आणि बुद्धिमत्तेचे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी मांडलेली अनेक सूत्रे इतकी प्रगत होती की, ती सिद्ध करण्यासाठी आधुनिक गणितज्ञांनाही कित्येक वर्षे लागली.दुर्दैवाने, प्रकृती अस्वास्थ्यामुळे २६ एप्रिल १९२० रोजी या महान गणितज्ञाने जगाचा निरोप घेतला. मात्र, मरण्यापूर्वीही त्यांनी 'मॉक थीटा फंक्शन्स'सारख्या अत्यंत क्लिष्ट विषयांवर काम केले होते. आजही हे विषय वैज्ञानिक क्षेत्रात 'ब्लॅक होल' आणि इतर भौतिक सिद्धांतांच्या अभ्यासात उपयुक्त ठरत आहेत.श्रीनिवास रामानुजन यांनी गणिताच्या जगाला दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करताना आपण केवळ एका महान गणितज्ञालाच नाही, तर प्रतिकूलतेवर मात करून ध्येयाचा ध्यास घेणाऱ्या एका महापुरुषाला स्मरतो. त्यांचा जीवनप्रवास आजही प्रत्येक भारतीय विद्यार्थ्यासाठी आणि गणितप्रेमीसाठी एक दीपस्तंभ आहे. भारताच्या या 'गणित-ऋषी'चा वारसा अनंत काळ विश्वाच्या गणितात गुंफलेला राहील.त्यांच्या महान कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय गणित दिन' म्हणून घोषित केला आहे, जो दरवर्षी २२ डिसेंबर रोजी साजरा केला जातो.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिंगबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिंगबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# नवोन्मेष, सर्जनशीलता आणि आर्थिक प्रगतीचा पाया

## जागतिक बौद्धिक संपदा दिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी २६ एप्रिल रोजी जगभरात जागतिक बौद्धिक संपदा दिन साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश म्हणजे बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचविणे, नवकल्पनांना प्रोत्साहन देणे आणि सर्जनशीलतेचा सन्मान करणे. विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, कला, उद्योग या सर्व क्षेत्रांमध्ये बौद्धिक संपदा ही प्रगतीची गुरुकिल्ली ठरते.

### बौद्धिक संपदा म्हणजे काय?

मानवी बुद्धी, कल्पकता आणि सर्जनशीलतेतून निर्माण होणाऱ्या निर्मितींना बौद्धिक संपदा म्हटले जाते. यात शोध, साहित्यकृती, संगीत, चित्रपट, संगणक सॉफ्टवेअर, ब्रँड नाव, लोगो, औद्योगिक डिझाइन यांचा समावेश होतो. या निर्मितींवर संबंधित व्यक्ती किंवा संस्थेचे हक्क असतात, ज्यांना कायद्याद्वारे संरक्षण दिले जाते.

### बौद्धिक संपदेचे प्रकार

बौद्धिक संपदा हक्कांचे विविध प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.
कॉपीराइट : साहित्य, संगीत, चित्रपट, कला यांसारख्या सर्जनशील कृतींवर हक्क



देतो.
**पेटंट :** नवीन आणि उपयुक्त शोधांवर संरक्षण प्रदान करतो.
**ट्रेडमार्क :** एखाद्या उत्पादनाची ओळख ठरवणारे नाव, चिन्ह किंवा लोगो सुरक्षित ठेवतो.
**डिझाइन हक्क :** उत्पादनाच्या बाह्य रचनेचे संरक्षण करतो.
**भौगोलिक संकेत :** विशिष्ट प्रदेशाशी संबंधित उत्पादनांना ओळख देतो (उदा.- विशेष कृषी किंवा हस्तकला उत्पादने).

### या दिवसाचे महत्त्व

- आजच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत बौद्धिक संपदा अत्यंत महत्त्वाची आहे.
- नवोन्मेषाला चालना मिळते.
- संशोधक आणि कलाकारांना प्रोत्साहन मिळते.
- उद्योग आणि व्यवसायाला स्पर्धात्मक फायदा मिळतो.
- देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळते.
- विशेषतः स्टार्टअप संस्कृती वाढत असताना बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण अधिक आवश्यक बनले आहे. योग्य संरक्षण नसल्यास कल्पना चोरीला जाण्याचा धोका असतो, ज्यामुळे नवकल्पनांना अडथळा निर्माण होऊ शकतो.

### डिजिटल युगातील आव्हाने

इंटरनेट आणि डिजिटल माध्यमांच्या प्रसारामुळे माहितीचे आदानप्रदान सोपे झाले आहे. मात्र, याचबरोबर कॉपीराइट उल्लंघन, पायरसी, बनावट उत्पादने यांसारख्या समस्या वाढल्या आहेत. त्यामुळे बौद्धिक संपदेचे संरक्षण अधिक कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर जनजागृती, कठोर कायदे आणि तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक ठरतो.

### भारताची भूमिका

भारताने बौद्धिक संपदा हक्कांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे आणि धोरणे लागू केली आहेत. स्टार्टअप इंडिया, मेक इन इंडिया यांसारख्या उपक्रमांमुळे नवोन्मेषाला चालना मिळत आहे. तसेच GI टॅगच्या माध्यमातून स्थानिक उत्पादनांना जागतिक स्तरावर ओळख मिळत आहे. जागतिक बौद्धिक संपदा दिन हा केवळ औपचारिक साजरा करण्याचा दिवस नसून, सर्जनशीलतेचा सन्मान करण्याची आणि नवकल्पनांना चालना देण्याची संधी आहे. प्रत्येकाने बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व समजून घेतले पाहिजे आणि त्याचे पालन केले पाहिजे. कारण नवोन्मेष आणि सर्जनशीलता यांच्यावरच उज्ज्वल भविष्याची उभारणी अवलंबून आहे.

# अंबानींच्या ‘अँटेलिया’त रोज चार हजार चपात्या कोणासाठी बनवितात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्तींपैकी एक असलेले मुकेश अंबानी आणि त्यांचे कुटुंब त्यांच्या साध्या राहणीसाठी आणि शाकाहारी जेवणासाठी ओळखले जाते. मात्र, सध्या सोशल मीडियावर अंबानींच्या अँटेलिया निवासस्थानी दररोज तयार होणाऱ्या चार हजार चपात्यांची जोरदार चर्चा रंगली आहे. अंबानींच्या अँटेलिया निवासस्थानी इतक्या मोठ्या संख्येने चपात्या नक्की कोणासाठी बनवल्या जातात, असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे. आपण याचे उत्तर जाणून घेऊ.



अंबानी कुटुंबाचा आहार अत्यंत साधा असला, तरी त्यांच्या निवासस्थानी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या मोठी आहे. ‘अँटेलिया’मध्ये सफाई कामगार, सुरक्षा रक्षक, चालक, स्वयंपाकी आणि तांत्रिक मदनीस असे सुमारे सहाशे कर्मचारी कार्यरत आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांना पौष्टिक आणि ताजे जेवण मिळावे, याची काळजी अंबानी कुटुंबाकडून घेतली जाते. याच कर्मचाऱ्यांच्या भोजनासाठी दररोज तब्बल चार हजार चपात्या तयार केल्या जातात.

कमी वेळेत हजारो चपात्या तयार करण्यासाठी अंबानींच्या किचनमध्ये अत्याधुनिक रोटी मेकर मशिन बसविण्यात आले आहे. हे मशिन काही मिनिटांत शेकडो चपात्या तयार करते. मात्र, चपात्यांची चव आणि दर्जा घरगुती राहावा, यासाठी एका विशेष शेफच्या टीमकडे याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार अंबानींच्या घरात काम करणाऱ्या मुख्य शेफचा पगार एखाद्या मोठ्या कंपनीच्या ‘सीईओ’च्या तोडीचा आहे. एका रोटी शेफला दरमहा सुमारे दोन लाख रुपये पगार दिला जातो, असे म्हटले जाते. यासोबतच कर्मचाऱ्यांना विमा आणि इतर शैक्षणिक सुविधाही पुरविल्या जातात.

अंबानी कुटुंब हे रात्री हलके आणि पचायला सोपे असे जेवण खातात. यासाठी ते नाचणी किंवा बाजरीची भाकरी, गुजराती स्टाईल भाज्या आणि सॅलड खाणे पसंत करतात.

अंबानी कुटुंब स्वतः जेवणात डाळ-भात, बाजरीची भाकरी आणि गुजराती पदार्थांना पसंती देते. पण आपल्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची आणि भोजनाची ते तितकीच तत्परतेने काळजी घेतात, हेच यावरून दिसून येते.

# ‘या’ मराठी अभिनेत्रीने १९ व्या वर्षी केले लग्न

## परपुरुषासोबत परदेशात पळून गेल्यानंतर आली रस्त्यावर राहण्याची वेळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूडमध्ये मराठी अभिनेत्रींनी एक काळ गाजवला. अनेक अभिनेत्रींनी स्वतःची वेगळी ओळख मिळविली. अत्यंत श्रीमंत कुटुंबात जन्मानंतर त्यांच्यावर धुणी-भांडी करण्याचीही वेळ आली. पुढे बॉलिवूडमध्येही नाव कमावले पण वैयक्तिक आयुष्य खूप संघर्षाचे होते. कोण आहे ही अभिनेत्री जाणून घेऊया.

या कलाकार आहेत ज्येष्ठ दिवंगत अभिनेत्री शशिकला जवळकर. सोलापूरमधील एका सधन कुटुंबात त्यांचा जन्म झाला. पण पुढे त्यांनी व्यवसायात मंदी आल्याने ते मुंबईला स्थलांतरित झाले. या काळात त्यांच्या कुटुंबाची



आर्थिक स्थिती खालावली. या काळात त्यांनी घरोघरी जाऊन धुण्याभांड्याची कामे केली. पण पुढे कुटुंबाची जबाबदारी सांभाळण्यासाठी त्यांनी सिनेमात काम करणे सुरू केले.

कुटुंबाची जबाबदारी सांभाळत असतानाच त्यांनी वयाच्या १९ व्या वर्षी ओमप्रकाश सैगल यांच्याशी लग्न केले. संसार करत असतानाच त्यांनी सिनेमात काम करणे सुरू ठेवले. पुढे त्यांना व्यवसायात तोटा झाला. आर्थिक परिस्थिती ढासळली. याचा परिणाम संसारावर झाला. ओपी आणि शशिकला यांच्यात भांडणे सुरू झाली. यातूनच त्या एका दुसऱ्या व्यक्तीच्या प्रेमात पडल्या.

त्या-त्या व्यक्तीच्या प्रेमात इतक्या आंधळ्या झाल्या होत्या, की त्यांनी स्वतःच्या पोटच्या पोरींना सोडले आणि त्याच्यासोबत परदेशात पळून गेल्या. पण ती व्यक्ती त्यांच्यासाठी योग्य नव्हती. त्याने तेथे त्यांचा खूप छळ केला, त्यांना मारहाण केली. शशिकला पुन्हा भारतात पळून आल्या; पण तोपर्यंत त्यांच्या कुटुंबाने त्यांच्यासोबत संबंध तोडले होते. त्यामुळे शशिकला अक्षरशः रस्त्यावर आल्या. त्यांनी अन्नासाठी भीक मागितली. या काळात मदर तेरेसांनी त्यांना आधार दिला. नऊ वर्षे स्वतःच्या घरात त्यांनी त्यांना आसरा दिला. त्यानंतर त्यांनी पुन्हा सिनेमात आणि मालिकांमध्ये काम करणे सुरू केले. सोनपरीसारखी मालिका त्यांनी केली. कभी खुशी कभी गम, चोरी-चोरी यांसारखे सिनेमेही त्यांनी केले.

# अभिनेत्री मौशमी चटर्जी

## सहज अभिनयाची मोहक ओळख

**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय चित्रपटसृष्टीत काही कलाकार आपल्या नैसर्गिक अभिनयशैलीमुळे आणि साधेपणामुळे प्रेक्षकांच्या मनात कायमस्वरूपी स्थान निर्माण करतात. अशाच अभिनेत्रींमध्ये अग्रक्रमाने घेतले जाणारे नाव म्हणजे मौशमी चटर्जी. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कारकिर्दीचा आणि योगदानाचा आढावा घेणे म्हणजे भारतीय सिनेमाच्या सुवर्णकाळाचा मागोवा घेण्यासारखे आहे.

### प्रारंभीचे जीवन आणि कारकीर्दीची सुरूवात

मौशमी चटर्जी यांचा जन्म २६ एप्रिल १९४८ रोजी झाला. त्यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरूवात बंगाली चित्रपटांपासून केली. लहान वयातच त्यांच्या अभिनयातील सहजता आणि भावनांची अभिव्यक्ती प्रेक्षकांना भावली. हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांना मोठी ओळख मिळाली ती ‘अनुराग’ या चित्रपटातून. या चित्रपटातील त्यांच्या भूमिकेने त्यांना घराघरांत पोहोचविले आणि त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्रींमध्ये त्यांची गणना होऊ लागली.

### यशस्वी चित्रपट आणि भूमिका

मौशमी चटर्जी यांनी अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम केले. त्यातील काही महत्त्वाचे चित्रपट पुढीलप्रमाणे. ‘रोटी कपड़ा और मकान’, ‘मंजिल’, ‘अंगूर’ या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका विविधतेने नटलेल्या होत्या. त्यांनी साध्या, भावूक स्त्रीपासून ते आत्मविश्वासू आणि ठाम व्यक्तिमत्त्वांच्या भूमिका अत्यंत प्रभावीपणे साकारल्या.

### अभिनयशैलीची वैशिष्ट्ये

मौशमी चटर्जी यांच्या अभिनयाची खासीयत म्हणजे त्यांची नैसर्गिकता. त्यांच्या संवादफेकीत कृत्रिमता नसून ती सहज आणि भावपूर्ण असते.



त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, डोळ्यांतून व्यक्त होणाऱ्या भावना आणि साधेपणामुळे त्या प्रेक्षकांशी थेट संवाद साधतात.

### सहकलाकारांसोबतची केमिस्ट्री

त्यांनी त्या काळातील अनेक नामवंत कलाकारांसोबत काम केले. विशेषतः अमिताभ बच्चन आणि संजिव कुमार यांच्यासोबतच्या त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना विशेष आवडल्या. त्यांच्या अभिनयामुळे चित्रपटांना एक वेगळी उंची मिळाली.

### दूरचित्रवाणी आणि नंतरची कारकीर्द

चित्रपटांबरोबरच मौशमी चटर्जी यांनी दूरचित्रवाणीवरही काम केले. काळानुसार त्यांनी आई किंवा कुटुंबातील ज्येष्ठ स्त्रीच्या भूमिका साकारूनही आपली छाप कायम ठेवली.

### पुरस्कार आणि सन्मान

त्यांच्या अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. त्यांच्या कामगिरीमुळे त्या केवळ एक यशस्वी अभिनेत्रीच नाही, तर एक आदर्श कलाकार म्हणून ओळखल्या जातात. मौशमी चटर्जी यांनी आपल्या अभिनयाच्या बळावर भारतीय चित्रपटसृष्टीत एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या सहज, भावपूर्ण आणि प्रामाणिक अभिनयामुळे त्या आजही प्रेक्षकांच्या मनात जिवंत आहेत. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कलाकृतींचे स्मरण करून त्यांच्या योगदानाला सलाम करणे हीच खरी आदरांजली ठरेल.

# ‘एमपीएससी’ची परीक्षा देऊन केले वडिलांवर अंत्यसंस्कार

## साताऱ्याचा विक्रम झाला अधिकारी; मन हेलावून टाकणारी कहाणी

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरची परिस्थिती बेताची. रोज कष्ट करून कसेबसे घर चालायचे. पण मुलगा हुशार निघाला. कुटुंबाच्या सगळ्या आशा आता त्याच्यावरच होत्या. विक्रमला अधिकारी व्हायचे होते. आई-वडिलांचे पांग फेडायचे होते. त्यासाठी तो रात्रंदिवस अभ्यास करायचा. कधी पैसे कमी पडायचे. तेव्हा गावकरी वर्गणी गोळा करून पैसे द्यायचे.

परीक्षेचा दिवस आला आणि पुन्हा दुर्दैवी संकटाने गाठले. वडिलांचे निधन झाले. कित्येक संकटांना थेट भिडलेला विक्रम येथे मात्र पार कोसळला. पण काही वेळातच स्वतःला सावरले. आता त्याला परीक्षा द्यायचीच होती. वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी. मनात प्रचंड दुःख, वडिलांच्या आठवणींचा कल्लोळ आणि पाणावलेले डोळे. तो तसाच परीक्षा केंद्रात गेला. आसवे पुसतच परीक्षा दिली. आणि घरी येऊन वडिलांना अखेरचा निरोप दिला.



सातारा येथील प्रचिती रामवाडीच्या विक्रम दत्तात्रय पाडळे याची ही संघर्ष गाथा. ध्येयासाठी आणि वडिलांच्या स्वप्नासाठी मनावर दगड ठेवून परीक्षा दिली. अखेर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २०२४ मधील परीक्षेचा निकाल आला. राज्यात ४२ वी रँक मिळवत विक्रम ‘टॅक्स असिस्टंट’ (कर सहाय्यक) झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत विक्रमने मिळविलेले हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभाप्रमाणे आहे.

विक्रमने साताऱ्यातील सयाजी विद्यालयातून अकरावी-बारावीचे शिक्षण घेतले. त्यानंतर यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातून बीएस्सी पदवी घेतली. त्यानंतर तो स्पर्धा परीक्षेकडे वळला. जिद्दीने अभ्यास केला मात्र परीक्षेच्या दिवशीच त्याच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. वडिलांचे निधन झाले. पण अंत्यविधीच्या काही तास आधी त्याने परीक्षेला हजेरी लावली. पेपर पूर्ण केला आणि त्यानंतर तो थेट अंत्यविधीसाठी उपस्थित राहिला.

### गावकरी वर्गणी काढून करायचे मदत

विक्रमला घरच्या परिस्थितीची जाणीव होती. त्यामुळे त्याने कोणताही महागडा क्लास न लावता स्वअभ्यासावर यश खेचून आणले. घरच्या परिस्थितीमुळे तो अनेकदा आर्थिक विवंचनेत देखील सापडला. मात्र, अशा वेळी रामवाडीतील मित्र आणि गावकरी त्याच्या मदतीला आले. तरुण मंडळाने त्याला खंबीर साथ दिली.

प्रसंगी वर्गणी गोळा करून त्याला आर्थिक मदत दिली. विक्रमनेही सर्वांच्या सहकार्याची जाणीव ठेवत कष्ट घेतले. दुःखाचा डोंगर कोसळलेला असतानाही ध्येयाशी तडजोड केली नाही. त्यामुळे विक्रमच्या यशाची बातमी समजताच गावकऱ्यांनी आणि मित्रांनी जल्लोष केला. वाजत-गाजत गावातून मिरवणूकच काढली.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे




## मना सज्जना...

# ‘समर्थाचिया सेवका वक्र पाहे...’



परम स्नेही मित्रहो,
श्लोक क्र. २७, २८,२९, ३० या चार श्लोकांचा अर्थ समजावून घेऊ. पुढील ३७ व्या श्लोकापर्यंत प्रत्येक श्लोकाचे शेवटचे चरण हे सारखेच आहे.

**श्लोक**
**भवाच्या भये काय भितोसि लंडी ।**
**धरी रे मना धीर धाकासी साडी ।**
**रघुनायका सारखा स्वामी शिरी ।**
**नुपेक्षि कदा कोपल्या दंडधारी ॥ २७ ॥**

मानवाला जगताना त्रिविध तापामुळे अनेक प्रकारची सुख-दुःखे भोगावी लागतात. त्यात आध्यत्मिक ताप, अधि भौतिक ताप आणि अधि दैवीक तापापासून निर्माण होणारी सुख-दुःखे असतात. त्यायोगे या भवसागरात मनुष्यप्राणी आपल्या मनाच्या भल्या-बुऱ्या कर्मामुळे प्राप्त होणारे सुख-दुःख भोगत असतो. या कारणे मन सतत बेचैन असते. त्याला या भवसागराची भीती वाटत असते. समर्थ अशा भित्र्या मनाला ‘भवाच्या भये काय भितोस लंडी’ असे म्हणून त्याची संभावना करतात. पण त्याचवेळी त्याला धीर धरायचेही शिकवितात. अनावश्यक धाक सोडायला सांगतात. रघुनायकासारखा समर्थ स्वामी पाठीशी असल्यावर का म्हणून भीती बाळगावी?

पुढे ‘नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी’ असे चौथे चरण आहे. या ठिकाणी नुंपेक्षा असे शब्द वापरले आहेत. नुपेक्षि म्हणजे उपेक्षा न करणारा, दुर्लक्ष न करणारा असा घ्यावा. रघुनायकासारखा भक्तवत्सल स्वामी आपल्या भक्तांची कधीही उपेक्षा करीत नाही.

**रघुनायकासारखा स्वामी दाता ।**
**असोनी शिरी वाहसी व्यर्थ चिंता ॥**
**नको विसरू राघवा भूजकांता ।**
**नुपेक्षी नुपेक्षी कदा तूच भ्रांता ॥**

असे आश्वासक वचन मनाला समर्थ देतात.

**दीनानाथ हा राम कोदंडधारी ।**
**पुढे देखता काळ पोटी थरारी ।**
**जना वाक्य नेमस्त हे सत्य मानी ।**
**नुपेक्षि कदा राम दासाभिमानी ॥ २८ ॥**

प्रभू श्रीरामचंद्राची पराक्रमी मूर्ती डोळ्यासमोर यावी, असे हे वर्णन आहे. दिनांचे नाथ असलेले श्रीराम हे कोदंड नावाच्या धनुष्याला धारण करून आहेत. त्यांचे हे धनुधारी रूप पाहून प्रत्यक्ष महा विकराल काळ देखील शरण येतो. तेथे अन्य संकटाचा काय पाड?

**पुढील श्लोकात ते म्हणतात...**
**पदी राघवाचे सदा ब्रीद गाजे ।**
**बळे भक्तरीपूशिरी कांबी वाजे ।**
**पुरी वाइली सर्व जेणे विमानी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ २९॥**

रामचंद्राच्या पायी असलेल्या तोरड (तोडे) यांचा सतत नाद होते. त्या नादातून भक्तांच्या रक्षणाचे ब्रीद घेतल्याचे वचन ऐकू येते. याशिवाय श्रीरामभक्तांच्या शत्रूच्या शिरावर धनुष्याचा आघात होतो. सारी अयोध्यापुरी ज्याने विमानाने वाहून नेली तो भक्तांची उपेक्षा करणार नाही. अशा सर्वगुण संपन्न, पराक्रमी, समर्थ श्रीरामांचा जो भक्त आहे त्याच्याकडे वाईट नजरेने पाहण्याची कुणाची प्राज्ञा होईल बरे? असे पुढील श्लोकात समर्थ मनाला विचारत आहेत.

**समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।**
**असा सर्व भूमंडळी कोण आहे ।**
**जयाची लीळा वर्णिती लोक तिनी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३०॥**

महा पराक्रमी, सदैव भक्ताच्या पाठीशी उभे राहून रक्षण करणाऱ्या प्रभू रामाची लीला तिन्ही लोकांत वर्णन केली जाते. भक्त रक्षक रामाला त्याचे चरणी शरण आलेल्या भक्ताचा अभिमान वाटतो. म्हणून राम नामाचा विसर मनाला पडता कामा नये.

**समर्थ वचन आहेच.**
**समर्थाची नाहीं पाठी । तयास भलताच कुटी ।**
**हा कारणे उठा उठी । भजन करावे.**
**जय जय रघुवीर समर्थ!**

**– भाऊसाहेब देशमुख, अमळनेर.**
**मो. :९४२०३८९५४१**

# भक्ती, तत्त्वज्ञान आणि संस्कृतीचा अद्वितीय वारसा : वल्लभाचार्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्मदिन विशेष

भारतीय संतपरंपरेत अनेक महान संतांनी समाजाला अध्यात्म, नैतिकता आणि भक्तीचा मार्ग दाखवला. अशाच तेजस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे वल्लभाचार्य. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा, तत्त्वज्ञानाचा आणि समाजावर झालेल्या प्रभावाचा विचार करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. वल्लभाचार्यांचा जन्म इ.स. १४७९ मध्ये झाला. त्यांचे बालपण अत्यंत विद्वत्तापूर्ण वातावरणात गेले. लहानपणापासूनच त्यांना वेद, उपनिषद आणि धर्मग्रंथांचा अभ्यास करण्याची आवड होती. त्यांनी संपूर्ण भारतभर तीर्थयात्रा करून विविध विद्वानांशी संवाद साधला आणि आपले तत्त्वज्ञान विकसित केले.

### पुष्टिमार्गाची स्थापना

वल्लभाचार्यांनी पुष्टिमार्ग या भक्तीसंप्रदायाची स्थापना केली. “पुष्टि” म्हणजे ईश्वराची कृपा. त्यांच्या मते, ईश्वराची कृपा (अनुग्रह) हीच भक्तीची मुख्य आधारशिला आहे. या मार्गात कठोर तपश्चर्या किंवा संन्यासापेक्षा प्रेम, श्रद्धा आणि समर्पणाला अधिक महत्त्व दिले जाते.

### तत्त्वज्ञान शुद्धाद्वैतवाद

वल्लभाचार्यांनी “शुद्धाद्वैत” या तत्त्वज्ञानाची मांडणी केली. या मतानुसार, ब्रह्म आणि जग हे वेगळे नसून एकच आहेत. जग हे ईश्वराचेच स्वरूप आहे आणि त्यात कोणताही भेद नाही. त्यामुळे जीवनातील प्रत्येक गोष्ट ही पवित्र आणि ईश्वराशी जोडलेली आहे, असा संदेश त्यांनी दिला.



### श्रीकृष्णभक्तीचा प्रसार

पुष्टिमार्गात श्रीकृष्ण यांच्या बालस्वरूपाची उपासना केली जाते. भक्तीमध्ये प्रेम, स्नेह आणि आत्मीयता यांना विशेष स्थान आहे. वल्लभाचार्यांनी भक्त आणि भगवान यांच्यातील नाते अत्यंत जवळचे आणि सजीव असल्याचे सांगितले.

### सामाजिक आणि सांस्कृतिक योगदान

वल्लभाचार्यांनी समाजात समता, प्रेम आणि सहिष्णुतेचा संदेश दिला. त्यांच्या शिकवणीतून सर्वसामान्यांना सहज भक्तीमार्ग उपलब्ध झाला. जातिभेद आणि कठोर धार्मिक नियमांना दुय्यम स्थान मिळाले. कला, संगीत आणि संस्कृतीला प्रोत्साहन मिळाले. विशेषतः मंदिरांमधील सेवा-भक्ती (सेवा पद्धती) ही पुष्टिमार्गाची वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आजही जपली जाते.

### आजच्या काळातील महत्त्व

आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात वल्लभाचार्यांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला प्रेम, समर्पण आणि सकारात्मकतेचा संदेश प्रत्येकाला जीवनात शांतता आणि समाधान देऊ शकतो. त्यांच्या तत्त्वज्ञानामुळे अध्यात्म अधिक सोपं आणि सर्वांसाठी सुलभ बनते. वल्लभाचार्य हे केवळ धार्मिक गुरु नव्हते, तर एक महान तत्त्वज्ञ, समाजसुधारक आणि संस्कृतीचे संवाहक होते. त्यांच्या शिकवणीने भारतीय भक्तीपरंपरेला एक नवा आयाम दिला. त्यांच्या जन्मदिनानिमित्त आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करून ते आपल्या जीवनात आचरणात आणणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल.

# गाठीं पडली ठका ठका । त्याचा धर्म बोले तुका ॥

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

साधारणतः लबाड धूर्त म्हटले, की आपल्याला लगेच कोल्हा आठवतो. एक ठक दुसऱ्या महाठकाला भेटला, की ते एकमेकाला बरोबर ठकवतात. जंगलात एकदा एक शक्तिशाली वाघ एका चतुर कोल्ह्याला भेटला. आणि एक लबाड दुसऱ्या लबाडाला भेटतो तेव्हा काय संवाद होतो ते तुकोबाराय आपल्याला सांगत आहे,

वार्धे उपदेशीला कोल्हा। सुखें खाऊं द्यावें मला॥
अंती मरसी तें न चुके। मज ही मारितोसी भुके॥

वाघ कोल्ह्याला म्हणतो की तू मला आता भेटलाच आहेस तर तू मला तुला सुखाने खाऊ दे. तुझ्या आयुष्याच्या शेवटी असाही तू मरणारच आहेस. मरण काही न चुकणारी गोष्ट आहे. म्हणून मला तू सुखाने खाऊ न देता भुकेने व्याकूळ होऊन कशासाठी उपाशी मारतोस? वाघाचा हा ‘लबाड’ उपदेश ऐकून ‘चतुर’ कोल्हा त्याला उत्तर देताना काय म्हणतो हे सांगताना तुकोबाराय म्हणतात,

येरू म्हणे भला भला। निवाड तुझ्या तोंडे जाला ॥
देह तंव जाणार । घडेल हा उपकार ॥
येरू म्हणे मनीं । ऐसें जावें समजोनि ॥

वाघोबा, ही गोष्ट भल्याची म्हणजे भल्याचीच झाली बघ, की मरण ही न चुकणारी गोष्ट आहे हा निवडा तुझ्याच तोंडून झाला. तू ही शेवटी मरणारच आहेस. मरण जसे मला चुकणार नाही, तसे ते तुलाही चुकणारच नाही. तर मग मला जीवदान देऊन तुझ्या जीवनात तुला परोपकार



करण्याची संधी चालून आली आहे. तू मला न खाता सोडून देऊन दे आणि पदरी पुण्य पाडून घे (असे ठग आपल्याला बऱ्याच ठिकाणी भेटत असतात) एवढे बोलून झाल्यावर पुढे शेवटी कोल्हा वाघोबाला आपले बोलणे चालू ठेवत म्हणतो, हे बघ, तू तुझ्याच तोंडून झालेला हा निवडा तूच तुझा-तुझा नीट लक्षात घेतला, म्हणजे ठीकच होईल. आता तू तुझ्याच बोलण्यावर ठाम राहा आणि तसे कर. ही गोष्ट सांगून झाल्यावर तुकोबाराय शेवटी म्हणतात,

गाठीं पडली ठका ठका । त्याचा धर्म बोले तुका ॥

अशा रीतीने स्वार्थी, लबाड किंवा चतुर स्वभावाची लोक जेव्हा एकमेकांना भेटतात तेव्हा ते स्वार्थी, लबाड आणि चतुरच उपदेश करतात. आणि एकमेकांना ठकवतात. काही दोन पायाचे पशू जरा चलाख असतात. ते सदैव आपल्या पशूपातळीवरच्याच गरजा भागवण्याचा विचार करतात पण त्याला ते तात्त्विक मुलामा देतात. या लोकांनी काही शब्द लिहिले, वाचलेले आणि पाठ केलेले असतात. त्याला ते ज्ञान म्हणतात. स्वतःला ते ज्ञानी, महाज्ञानी म्हणवतात. त्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी न करता ते फक्त आपला स्वार्थ साधण्यासाठी, आपल्या ऐहिक गरजांची पूर्ती करण्यासाठीचे एक साधन म्हणून करतात. ते ज्याला ज्ञान म्हणतात ते केवळ शब्दांचे बुडबुडे असतात. ते जे तत्त्वज्ञान सांगतात त्याचा मागमूसही त्यांच्या स्वतःच्या आचरणात दिसत नाही. चराचरात एकच ब्रह्म भरलेले आहे असे ते म्हणतात. मात्र आम्ही उच्च जातीत, उच्च कुळात, उच्च वर्णात जन्मलो म्हणून आम्ही सर्वश्रेष्ठ आहोत अशी शेखी मिरवतात. देह माया म्हणतात आणि देहाचेच सर्व कोडकौतुक पुरवतात. जग मिथ्या आहे असे म्हणतात आणि लोकांना लुबाडून आपली धनदौलत वाढवतात. वासनामुक्त झाल्याशिवाय मुक्ती नाही म्हणतात आणि स्वतः मात्र अखंड वासनांच्या डोहात डुंबत राहतात. थोडक्यात हे समाजाच्या डोळ्यात धूळफेक करतात. समाजाची दिशाभूल करतात. समाजाला फसवतात, की लुबाडतात आणि आपला पिंड पोसतात. तुकोबारायांना या नीच, लबाड व्रूत्तीचा फार राग आहे. नम्रता, सर्वांभूती समत्व, सर्वांभूती आत्मियता, उच्चनीच भावाचे, भेदभावाचे मनातून पूर्ण उच्चाटण, खरे वैराग्य, षकिरांपासून मुक्ती, इंद्रियांवर ताबा वगैरे जी संतांची लक्षणे असतात. त्यापैकी कोणतेही लक्षण अंगी नसताना हे शब्दज्ञानी लोक स्वतःला इतरांचे गुरू म्हणवतात. आपण इतरांना उपदेश करायला लायक आहोत, असे समजतात. म्हणून अशा लोकांविषयीचा आपला तिटकारा व्यक्त करताना तुकोबाराय म्हणतात, ‘तुका म्हणे अहो देवा दिनानाथा । दरुषण आतां नको त्याचें ॥’ तुकोबारायांनी चारशे वर्षांपूर्वी आपल्याला इशारा दिला आहे की अशा धूर्त, पाताळयंत्री, धोकेबाज, लबाड, स्वार्थी, जुमलेबाज लोकांचे तोंडही पाहू नका. त्यांना जवळ करू नका. त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. नादी तर मुळीच लागू नका. ज्यांचे तोंडही पाहू नये त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवला, त्यांच्या नादी लागलो, त्यांना डोक्यावर घेतले तर त्याची फळे भोगावी लागणारच. रडण्याची वेळ येणारच. सर्वनाश होणारच.

आपल्याला सर्वनाशापासून वाचायचे असेल, अवनती थांबवून पुन्हा प्रगतीच्या दिशेने जायचे असेल, पुन्हा आपल्या हातून अशी चूक होऊ द्यायची नसेल तर तुकोबाराय दिशा दाखवू शकतात. वैयक्तिक आयुष्य असो की सार्वजनिक जीवन असो अशा पिंडशोषकाला ओळखून दूर ठेवले पाहिजे. लबाडांच्या गोड बोलण्याला, गाजरे दाखविणाऱ्यांच्या लबाडीला बळी पडता कामा नये. हे चातुर्य जर आपण कमवू शकलो, अंगी बाणवू शकलो तरच आपण अभिमानाने म्हणू शकू की तुकोबाराय हेच आमचे गुरू.


**। जय जगद्गुरू तुकोबाराय।**

# श्री केदारनाथ धाम शिवतत्त्वाचे अद्भुत रहस्य...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हर हर महादेव.
हिमालयाच्या कुशीत वसलेल्या आणि कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान असलेल्या आपल्या लाडक्या केदारनाथ धामचे कपाट जेव्हा सहा महिन्यांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर भाविकांसाठी उघडले जातात, तेव्हा तो सोहळा नुसता डोळ्यांचे पारणे फेडणारा नसतो, तर तो साक्षात शिव तत्त्वाचा जीवंत अनुभव असतो. ही भक्तीची वाट सोपी नक्कीच नाही. या यात्रेची सुरूवात गौरीकुंडवरून होते, जेथे साक्षात माता पार्वती यांनी महादेवांना प्राप्त करण्यासाठी कठोर तपश्चर्या केली होती. तेथील तप्तकुंडात स्नान करून जेव्हा भाविक १६ ते १८ किलोमीटरची ती अतिशय खडतर आणि उभी चढण चढायला लागतात, तेव्हा खऱ्या अर्थाने श्रद्धेची परीक्षा सुरू होती. जसजसे वर जावे तसतसा ऑक्सिजन कमी होत जातो, श्वासाची कोंडी होते, पाय जड होतात, पण तरीही मुखातून केवळ ‘हर हर महादेव’ आणि ‘जय भोलेनाथ’चा गजर चालू असतो. त्या कठीण वाटेवर कुणीही अनोळखी राहत नाही. तेथे जात-पात, श्रीमंत-गरीब हा कोणताही भेद नसतो. निसर्गाच्या त्या अवाढव्य रौद्र रूपासमोर माणूस स्वतःला अगदी क्षुल्लक समजतो, अनोळखी माणसे एकमेकांचा आधार बनतात आणि तीच भक्ती त्यांना वरपर्यंत पोहोचण्याची मोठी ऊर्जा देते. वर पोहोचल्यावर मंदिराच्या एका बाजूला खळखळून वाहणारी पवित्र मंदाकिनी नदी आणि पाठीमागे उभी असलेली केदारनाथची अवाढव्य बर्फाच्छादित शिखरे डोळ्यांचे पारणे फेडतात. पहाटेच्या वेळी जेव्हा सूर्याची पहिली सोनेरी किरणे त्या बर्फाळ शिखरांवर पडतात, तेव्हा ते दृश्य साक्षात सुवर्णासारखे चमकते. कपाट उघडण्याची ही प्रक्रिया अत्यंत विधीवत आणि मंत्रमुग्ध करणारी असते. जेव्हा हिवाळा संपतो आणि दरवाजे उघडण्याची वेळ येते, तेव्हा बाबा केदारनाथांची पंचमुखी उत्सव मूर्ती उखीमठच्या ओंकारेश्वर मंदिरातून पालखीत बसवून मोठ्या थाटामाटात गुप्तकाशी, फाटा, गौरीकुंड असा प्रवास करत केदारनाथला आणली जाते. कपाट उघडण्यापूर्वी या क्षेत्राचे रक्षक म्हणजेच ‘क्षेत्रपाल’ श्री भैरवनाथ यांची विशेष पूजा केली जाते. कारण त्यांच्या परवानगीशिवाय केदारनाथच्या मुख्य मंदिरात प्रवेश करता येत नाही.

जेव्हा कर्नाटकातून आलेले रावळ म्हणजेच मुख्य पुजारी, लष्करी बँडचा अंगावर काटा आणणारा निनाद आणि हजारो भाविकांच्या ‘हर हर महादेव’च्या अखंड गजरात मंदिराचे कुलूप उघडतात, तेव्हा सगळ्यात आधी दर्शन होते ते आतल्या ‘अखंड ज्योती’चे! विचार करा, उणे तापमान आणि श्वास घ्यायला ऑक्सिजन नसतानाही सहा महिने ही ज्योत त्या अंधाऱ्या गाभाऱ्यात जशीच्या तशी तेवत असते. देवाला सहा महिन्यांपूर्वी वाहिलेली फुले, बेलाची पाने आणि चंदनाचा सुगंध असा काही दरवळतो की ते अगदी



काल रात्रीच लावल्यासारखे ताजे वाटते. हा साक्षात शिवाचा चमत्कार अनुभवण्यासाठीच तेथे भक्तांचा महासागर लोटतो. या स्वयंभू आणि जागृत देवस्थानाच्या स्थापनेची कथाही तितकीच काळजाचा ठोका चुकवणारी आहे.

महाभारताच्या महाभयंकर युद्धानंतर पांडवांना स्वतःच्याच भावंडांना मारल्याचे म्हणजे गोत्रहत्येचे मोठे पाप लागले होते. या पापातून मुक्ती मिळवण्यासाठी ते शिवशंभूंच्या शोधात हिमालयात आले. पण महादेव त्यांच्यावर नाराज असल्याने त्यांनी दर्शन न देण्यासाठी चक्क एका बैलाचे रूप घेतले आणि ते जमिनीत गुप्त होऊ लागले. तेव्हा महाबली भीमाने त्या बैलाला मागून पकडण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्या झटापटीत बैलाच्या पाठीचा त्रिकोणी भाग तिथेच राहिला. केदारनाथमध्ये आपण ज्या नैसर्गिक शिळेची पूजा करतो, ती साक्षात महादेवाची पाठ आहे. याच घटनेतून ‘पंचकेदार’ ही अद्भूत परंपरा उदयाला आली, जिथे महादेवांचे बाहू ‘तुंगनाथ’ला प्रकट झाले, मुख ‘रुद्रनाथ’ला, नाभी ‘मध्यमहेश्वर’ला आणि जटा ‘कल्पेश्वर’ला प्रकट झाल्या. जो भाविक या पंचकेदार यात्रेला जाऊन दर्शन घेतो, तो सर्व पापातून मुक्त होऊन मोक्ष मिळवतो अशी आपली प्रबळ श्रद्धा आहे. मंदिराच्या स्थापत्यकलेचेही एक मोठे रहस्य आहे. हे मंदिर कत्यूरी शैलीत बांधले गेले असून, त्यात महाकाय दगड एकमेकांत गुंफून (इंटरलॉकिंग पद्धतीने) उभे केले आहेत आणि त्यात सिमेंट किंवा चुन्याचा कोणताही वापर केलेला नाही.

हे मंदिर आठव्या शतकात आद्य शंकराचार्यांनी पुनरुज्जीवित केले. आद्य शंकराचार्यांचे या मंदिराशी आणि संपूर्ण सनातनी परंपरेशी अतूट नाते आहे. संपूर्ण भारताचे भ्रमण करून हिंदू धर्माचा प्रचार आणि प्रसार केल्यानंतर, अवघ्या ३२ व्या वर्षी त्यांनी याच केदारनाथ धाममध्ये आपली देह त्यागून महासमाधी घेतली होती. २०१३ च्या प्रलयात मंदिराच्या मागची त्यांची प्राचीन समाधी उद्ध्वस्त झाली होती, पण त्यानंतर तिथे अत्यंत भव्य असे पुनर्निर्माण करण्यात आले. तिथे म्हैसूरच्या काळ्या पाषाणातून (कृष्णशिळा) घडवलेली त्यांची १२ फुटी अतिशय दिव्य आणि ध्यानमग्न मूर्ती नव्याने प्रस्थापित करण्यात आली आहे. ती मूर्ती पाहिल्यावर मनाला जी शांतता मिळते, ती केवळ शब्दांच्या पलीकडे आहे. जणू काही आजही ते तिथे बसून अखंड शिवचिंतन करत आहेत आणि आपल्याला धर्माच्या वाटेवर चालण्याची ऊर्जा देत आहेत. मंदिरात जाऊन दर्शन घेण्याची शास्त्रोक्त पद्धत अतिशय भावपूर्ण आहे. तिथे गेल्यावर केवळ लांबून हात जोडून चालत नाही, तर मंदिरात गाभाऱ्यात गेल्यावर त्या स्वयंभू त्रिकोणाकृती शिळेला साष्टांग नमस्कार करायचा असतो. त्यानंतर अगदी जवळून स्वतःच्या हाताने साजूक तूप आणि बेलाचे पान त्या पाषाणावर अर्पण करायचे असते. आपले मस्तक त्या थंडगार पाषाणावर टेकवून जेव्हा आपण डोळे मिटतो, तेव्हा त्या हजारो वर्षे जुन्या शिळेतून साक्षात महादेवाच्या अस्तित्वाची आणि ऊर्जेची जी स्पंदने अंगात भिनतात, ती कोणत्याही शब्दात सांगता येत नाहीत. तो क्षण म्हणजे आपण आपले सगळे दुःख, संकटे आणि पापांचा भार बाबाच्या चरणी सोपवून कायमचे मोकळे होतो. जेव्हा हिवाळा सुरू होतो आणि केदारनाथमध्ये अक्राळविक्राळ बर्फवृष्टीला सुरुवात होते, तेव्हा मंदिर बंद करण्याची म्हणजेच कपाट बंद करण्याची प्रक्रिया सुरू होते. दिवाळीनंतर येणाऱ्या भाऊबीजेच्या दिवशी साधारणतः हे कपाट बंद केले जातात. यावेळी बाबा केदारनाथाची उत्सव मूर्ती पालखीतून खाली आणली जाते आणि पुढचे सहा महिने सर्व मानवी पूजा उखीमठमध्ये चालतात. पण मूळ केदारनाथ मंदिरात कपाट बंद करण्यापूर्वी रावळ आत एक मोठा दिवा लावतात, शिळेला भस्म आणि चंदनाचा लेप लावतात आणि दरवाजे बंद करून कुलूप ठोकतात. पुराणात असे स्पष्ट सांगितले आहे, की जेव्हा माणसांसाठी दर्शन बंद होते, तेव्हा तेथे प्रत्यक्ष देव, गंधर्व आणि अदृश्य सिद्ध पुरुष रोज महादेवाची पूजा करतात. निसर्गाचा कोप असो वा २०१३ चा तो महाप्रलय, ज्यात संपूर्ण केदारपुरी मंदाकिनी नदीच्या प्रवाहात वाहून गेली, पण भीम शिळेच्या रूपात साक्षात महादेवाने ढाल बनून या अद्भूत मंदिराचे रक्षण केले. म्हणूनच आयुष्यात एकदा तरी तेथे जाऊन शिवशंभूंच्या या असीम उर्जेचा अनुभव प्रत्येकाने घ्यायलाच हवा.

**। ओम नमः शिवाय।**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)